## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥

दयाळू रुपी प्रेमळ बाबा माझे........2वेळा
गाते तुम्हा आरती
जय जय जय बाबा मूर्ती ॥धृ॥

उल्हासिच्या तिरी बाबा उल्हासिच्या तिरी बाबा
बाळकृष्ण रुपे नांदती ॥1॥

पावन झाले वांगणी गाव ,पावन झाले वांगणी गाव
नको प्रयाग अन आदी ॥2॥

येता तुम्ही दरबारी या ,येता तुम्ही दरबारी या
हासूनी स्वागत बाबा करती ॥3॥

गोष्टी रुपाने आचरणाचे ,गोष्टी रुपाने आचरणाचे
अमृत तुम्हा बाबा देती ॥4॥

भक्तांची सेवा बाबा करीती , भक्तांची सेवा बाबा करीती
नास्ता, चहा ,भोजन देती ॥5॥

प्रसाद तो घेऊनी येता घरी ,प्रसाद तो घेऊनी येता घरी
बाबांची ठेवा तुम्ही स्मृती ॥6॥

★★★★★